।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

# साप्ताहिक माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना ६ नोव्हेंबर १९८३
RNI NO. MAH/MAR/2004/16467
POSTAL REGD. L2/RNP/PPR/04/2024-2026
FACEBOOK MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २२ वे | रविवार दि २३ नोव्हेंबर २०२५ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ४८ वा


## नगराध्यक्ष पदाचे उमेदवार मारुतीआबा बनकर यांना नागरिकांचा वाढता आणि उत्स्फूर्त प्रतिसाद

### रस्ते, गटारी स्वच्छता आणि दिवे आदी महत्वाची कामे पूर्ण करण्याचा निर्धार



सांगोला : आगामी सांगोला नगरपालिका निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर भाजपने नगराध्यक्ष पदासाठी मारुती आबा बनकर या नावावर शिक्कामोर्तब केल्याची चर्चा शहरभर पसरताच राजकीय वातावरण अधिकच तापले आहे. त्यांच्या उमेदवारीनंतर शहरातील विविध प्रभागातून मोठा नागरिक प्रतिसाद मिळत असून भाजपच्या तळागाळातील कार्यकर्त्यांनाही मोठी ऊर्जा मिळाल्याचे दिसत आहे. विकास करायचा असेल तर भाजप हा निश्चित पर्याय अशी भावना नागरिकांमध्ये रुजत असून त्यामुळे माजी नगराध्यक्ष मारुती आबा बनकर यांच्या उमेदवारीला प्रचंड आणि उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

मारुती आबा बनकर हे शांत, समतोल स्वभावाचे आणि सामाजिक बांधिलकी जपणारे नेतृत्व म्हणून ओळखले जातात. अनेक वर्षांपासून शहरातील विविध उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असल्याने त्यांची प्रतिमा सामान्य नागरिकांमध्ये विश्वासार्ह आणि लोकाभिमुख अशी निर्माण झाली आहे.

आगामी नगरपालिका निवडणूक २०२५ मध्ये भाजपचे नगराध्यक्ष पदाचे प्रमुख दावेदार म्हणून उदयास आलेले माजी नगराध्यक्ष श्री. मारुतीआबा बनकर हे शहरातील चर्चेचे केंद्रबिंदू ठरत आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नगराध्यक्ष पदाचे त्यांचे पूर्वानुभव, प्रशासनातील पारदर्शकता आणि विकासाला दिलेली गती – या सर्व गोष्टींमुळे नागरिकांचा कल त्यांच्याकडे स्पष्टपणे वाढताना दिसत आहे. मारुती आबा यांनी नगराध्यक्ष म्हणून काम करताना पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते दुरुस्ती, बाजारव्यवस्था, नागरिक तक्रार निवारण यासारख्या अनेक महत्त्वाच्या विषयांवर ठोस निर्णय घेतले होते. या कार्यकाळातील त्यांच्या सक्रियतेची आणि निर्णयक्षमतेची नागरिकांना चांगली आठवण असल्याने अनुभवी नेतृत्व हा घटक त्यांना अधिक मजबूत बनवतो आहे.

भाजपची सांगोल्यातील वाढती ताकद, मारुती आबांचा अनुभव आणि विकासाभोवती तयार होत असलेले वातावरण यामुळे नगराध्यक्षपदाच्या स्पर्धेत मारुती आबांचे स्थान अधिक भक्कम झाले आहे.

## उद्याच्या निवडणुकीत जनतेचा कौल हा शिवसेनेच्या बाजूने असेल : आनंदाभाऊ माने

### शिवसेना पक्षाचे प्रभाग ५ चे उमेदवार काशिलिंग गावडे व छायाताई सूर्यकांत मेटकरी यांच्या प्रचाराचा धुमधडाक्यात शुभारंभ



सांगोला : शेकाप पक्षाने जाहीर केलेला नगराध्यक्ष पदाचा उमेदवार भाजपने हायजॅक केला. आणि आता शेकाप भाजपचाच प्रचार करत असल्यामुळे शेकाप वर नामुष्की ओढावली आहे. यामध्ये भाजपने शेकाप पक्ष पूर्ण गिळला आहे असे म्हणलं तरी वावगं ठरणार नाही. अशी टीका करीत, उद्याच्या निवडणुकीत जनतेचा कौल हा शिवसेनेच्या बाजूने असेल यामधून मा. आम. शहाजीबापू पाटील यांच्या विश्वासाला जनता साथ देईल आणि निश्चितपणाने नगराध्यक्ष पदासह सर्वच्या सर्व जागेवर शिवसेनेचे उमेदवार निवडून येतील असा विश्वास नगराध्यक्ष पदाचे उमेदवार माजी गटनेते आनंदाभाऊ माने यांनी व्यक्त केला आहे.

प्रभाग क्रमांक ५ मधील शिवसेना पक्षाचे अधिकृत उमेदवार काशिलिंग (बाबू) गावडे व छायाताई सूर्यकांत मेटकरी यांच्या प्रचाराचा काल शनिवारी मोठ्या धुमधडाक्यात शुभारंभ झाला. यावेळी प्रभाग पाच मधील मतदार बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कार्यकर्त्यांनी शिवसेना जिंदाबाद, शहाजीबापू पाटलांचा विजय असो, आनंदाभाऊ माने तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है अशा घोषणा दिल्या.

सांगोला नगरपालिका पंचवार्षिक निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वप्रथम प्रभाग पाच मधील शिवसेना पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ सुरुवात करण्यात आली आहे. आई अंबिका देवी मातेचे दर्शन घेऊन प्रचाराला सुरुवात करण्यात आली. या प्रचारासाठी उमेदवारांसह नागरिक महिलांनी आघाडी घेतली आहे. तरुणांनी देखील यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवत. शिवसेनेचा पक्षाचे उमेदवार यांनाच विजयी करण्याचे आवाहन केले जात आहे.

या आव्हानाला मतदारांकडून देखील चांगला प्रतिसाद मिळत असून, शहरात आणि गल्लीबोळात देखील या निमित्ताने शिवसेनेचा आवाज घुमला जात असल्याचं कार्यकर्त्यांकडून सांगितले जात आहे.

मागील निवडणुकांमध्ये विकासाचा अजिंठा तयार करून सांगोल्याला स्मार्ट सिटी बनवण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला आहे. परंतु शेकाप आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे नगरसेवकांची संख्या व अधिक असल्यामुळे त्यांनी कायमच विकासाला खोडा घालण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक विकासाचं काम हाणून पाडले अडवून धरले. तरीही नगराध्यक्ष पदाच्या निधीच्या माध्यमातून बऱ्यापैकी सांगोल्याचं विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. यामधून काही अपुरी काम राहिली तर स्वखर्चाने ती कामे पूर्ण करून घेण्याचा प्रयत्न केला आहे. आता येणाऱ्या निवडणुकीत सर्वाधिक संख्या बळ शिवसेनेचे असणार असल्याने स्मार्ट सिटी चे स्वप्न लवकरच पूर्ण करू असे शिवसेना, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आनंदाभाऊ माने यांनी सांगितले.

## नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आनंदा गोरख माने व सर्व शिवसेना उमेदवारांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सांगोल्यात जाहीर सभा; प्रचाराचा नारळ फुटणार



सांगोला : सांगोला नगरपालिका निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शिवसेनेकडून मोठी ताकद दाखवत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली असून शहरात याची मोठी चर्चा सुरू आहे. ही सभा नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आनंदा गोरख माने व सर्व शिवसेना उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आली असल्याची माहिती माजी नगराध्यक्ष रफिक भाई नदाफ यांनी दिली.

सभेचे आयोजन रविवार, दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक, सांगोला येथे करण्यात आले आहे. या महत्त्वपूर्ण सभेचे आयोजन सांगोला विधानसभेचे मा.आम. शहाजीबापू पाटील यांच्या नेतृत्वाखाली केले जात असून, शहरातील शिवसैनिक आणि नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे. शहरातील शिवसैनिकांनी सभेच्या तयारीसाठी मोहीम राबवली असून पोस्टर, सोशल मीडिया अपडेट्स आणि जनसंपर्क मोहिमेची मोठी चळवळ सुरू आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीमुळे निवडणुकीचे वातावरण अधिक रंगतदार झाले आहे.

उपमुख्यमंत्र्यांची सभा म्हणजे शिवसेनेच्या उमेदवारांना फायदा होणार असून यामुळे सांगोला नगरपालिका निवडणुकीतील राजकीय समीकरणे अधिक बदलू शकतात, असे चित्र सध्या दिसून येत आहे. सांगोला नगरपालिका निवडणुकांमध्ये भाजप शेकाप व दीपक आबा गटांच्या एकत्रीकरणामुळे राजकीय समीकरणात मोठा बदल झाल्याचे सर्वत्र बोलले जात होते.

या पार्श्वभूमीवर शिवसेना (शिंदे गट) सांगोल्यात काही प्रमाणात एकाकी पडत आहे असे वाटले होते परंतु प्रचारामध्ये नगराध्यक्ष आणि २३ नगरसेवकांनी मोठी आघाडी घेतली आहे.

यावर ना.एकनाथ शिंदे यांच्या सभेमुळे सर्व कार्यकर्त्यांमध्ये जल्लोषाचे व उत्साहाचे वातावरण तयार झाले आहे. तरी सांगोला शहर व तालुका परिसरातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन माजी नगराध्यक्ष रफिकभाई नदाफ यांनी केले आहे.

# वित्तीय भांडवलशाही : नवे साम्राज्य, नवा गुलाम



आजच्या काळात जगावर राज्य करणारे साम्राज्य शस्त्रांनी नाही, तर 'पैशाने' चालते. हीच आहे वित्तीय भांडवलशाही जिथे भांडवल, म्हणजे पैसा, बाजार आणि बँकिंग यंत्रणा मिळून सत्तेचे खरे केंद्र बनले आहे. पूर्वी साम्राज्ये तोफा, तलवारी आणि सैन्याच्या जोरावर उभी राहत. आज ती संगणकाच्या स्क्रीनवर, शेअर बाजाराच्या चढउतारात आणि बँकांच्या निर्णयांत उभी राहतात. एका क्लिकवर अब्जावधी डॉलर एका देशातून दुसऱ्या देशात हलवले जातात आणि त्या हालचालींवर संपूर्ण राष्ट्रांचे भविष्य अवलंबून असते. ही व्यवस्था कामगार, शेतकरी आणि सामान्य जनतेच्या कष्टावर उभी आहे, पण नफा मात्र काही हातात केंद्रित आहे. कॉर्पोरेट्स, गुंतवणूक बँका आणि वित्तीय संस्थांनी जगाचा नकाशाच बदलून टाकला आहे.

आज बहुतेक देशांचा अर्थसंकल्प, विकासनीती आणि सामाजिक धोरणेही आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांच्या अटींवर ठरतात. विकासाच्या नावाखाली देश कर्जाच्या ओझ्याखाली जातात आणि त्यांच्या लोकशाहीवर 'बाजार' अधिराज्य गाजवतो. शेअर बाजारातील घसरण म्हणजे सर्वसामान्य माणसाचे भविष्य धोक्यात. चलनवाढ वाढली की गरिबांचा स्वप्नांचा संसार मोडतो, पण काही 'गुंतवणूकदार' मात्र या अस्थिरतेतूनही नफा कमावतात. हीच तर भांडवलशाहीची निर्दयी गणिती पद्धत आहे.

आज वित्तीय साम्राज्य केवळ बँकांपुरते मर्यादित नाही. डिजिटल पेमेंट्स, क्रिप्टोकरन्सी, फिनटेक कंपन्या आणि ई-कॉमर्स यांनी नवीन आर्थिक गुलामी निर्माण केली आहे. डेटा म्हणजेच नवीन सोनं झालं आहे. मोठ्या कंपन्या तुमच्या खरेदीच्या सवयी, आवडीनिवडी आणि स्वप्नांचाही व्यापार करतात. ग्राहक आता ग्राहक राहिला नाही तर तो एक डेटा प्रॉडक्ट बनला आहे. भारतातील आर्थिक सुधारणांनंतर (१९९१ पासून) वित्तीय भांडवलशाहीने आपले पाय खोलवर रोवले. खासगीकरण, परकीय गुंतवणूक आणि कॉर्पोरेट अनुदान यांच्या जोरावर संपत्तीची मोजकी केंद्रे तयार झाली. एकीकडे शेअर बाजार तेजीत, तर दुसरीकडे शेतकरी आत्महत्या ही विषमता वित्तीय भांडवलशाहीची सर्वात क्रूर ओळख आहे.

राजकीय पक्षांनाही निधी देणारे हेच कॉर्पोरेट घराणे. त्यामुळे लोकशाहीचे निर्णय 'जनतेसाठी' नव्हे तर 'गुंतवणूकदारांसाठी' घेतले जातात. माध्यमांपासून धोरणांपर्यंत सर्वत्र पैशाची छाप दिसते. परिणामतः जनतेचे शासन 'कॉर्पोरेट लोकशाही' बनले आहे. वित्तीय भांडवलशाहीविरोधात संघर्ष म्हणजे फक्त आर्थिक नव्हे तर सांस्कृतिक आणि वैचारिक लढा आहे. स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत करणे, सहकार, शेती, हस्तकला आणि नैतिक गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे, वित्तीय शिक्षण आणि पारदर्शक बँकिंग ही काही प्राथमिक पावले आहेत. परंतु खरी गरज आहे, मानवकेंद्री अर्थव्यवस्थेची. पैसा साधन राहावा, उद्देश नव्हे. आज जगात सर्वात मोठा धोका अणुबॉम्ब नाही, तर पैशाच्या हातात आलेली सत्ता आहे. वित्तीय भांडवलशाहीने माणसाला ग्राहक बनवले, समाजाला बाजार आणि राष्ट्रांना कंपन्यांचे शेअर बनवले. ही साखळी तोडायची असेल, तर विचार बदलावा लागेल माणूस पैशासाठी नव्हे, पैसा माणसासाठी या तत्त्वाकडे परत जावं लागेल.

-प्रवीण बागडे,नागपूर

## ग्रामीण भागातील भारनियमन तातडीने बंद करा- ॲड.विशालदिप बाबर



सांगोला : सांगोला तालुक्यातील ग्रामीण भागात विशेषता निजामपूर सबस्टेशन व सोनंद सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या गावांना व वाड्या वस्त्यांना महावितरण कंपनीने जुलमी व बेकायदेशीर असे सकाळी ५.०० ते ९.०० वाजेपर्यंत व संध्याकाळी ६.०० ते ८.०० वाजेपर्यंत भार नियमन गेले एक महिन्यापासून सुरू आहे. महावितरणच्या या मनमानी कारभारामुळे परिसरातील शेतकरी व नागरिक हैराण झालेले आहेत. त्याबाबत त्यांनी स्थानिक महावितरणचे कर्मचाऱ्यांना विचारले असता त्यांच्याकडून समाधानकारक उत्तरे न देता वरीष्ठांचा आदेश आहे असे तोडके उत्तर देऊन नागरिकांची बोळवण केली जाते. महाराष्ट्र सरकार एका बाजूला महाराष्ट्र भारनियमन मुक्त असल्याच्या बाता मारत आहे तर दुसर्या बाजूला आजही ग्रामीण भागात सहा सहा तास मनमानीपणे कर्मचारी भारनियमन करीत आहेत.

त्यातही शेती पंपासाठी सोडली जाणारी वीज ही कमी दाबाने सोडली जाते त्यामुळे शेतकर्यांच्या शेती पंपांचे खुप मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. सध्या थंडीचे दिवस असुन नागरिक उठायच्या अगोदरच वीज गायब होते संध्याकाळी झोपण्यापूर्वी वीज येते. वास्तविक वीज वितरण कंपनीचा भारनियमनाच्या बाबतीत पूर्णपणे मनमानी कारभार सुरू असुन नागरिक व शेतकरी यांना वीज असुन अडचण नसून खोळंबा अशी परिस्थीती येथील नागरिकांवर आलेली आहे.

तसेच सोनंद सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या गावांना शेतीसाठी दिवसा पुर्ण दाबाने वीज पुरवठा करावा अशीही मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. त्याबाबत दि. २०/ ११/२०२५ रोजी ॲड. विशालदिप बाबर व शेतकर्यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता श्री. शिंदे साहेब यांची पंढरपुरात सविस्तर भेट घेऊन या अन्यायकारक भारनियमन तातडीने बंद करा अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला.

त्यावेळी कार्यकारी अभियंता श्री. शिंदे यांनी तातडीने सदर सुरु असलेले भारनियमन बंद करण्याबाबत आवश्यक असणार्या उपाययोजना करण्याचे कार्यवाही करण्याची हमी ॲड विशालदिप बाबर यांना दिलेली आहे. सदर निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, अधीक्षक अभियंता सोलापूर, आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख व सहाय्यक अभियंता हतीद श्री. बनसोडे यांना दिलेल्या आहेत. सदर निवेदनाची दखल घेऊन महावितरण कंपनीने जुलमी भारनियमन बंद न केल्यास उग्र आंदोलन करण्याचा निर्णय शेतकर्यांनी घेतलेला आहे.


**महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग**

**कार्यकारी अभियंता निरा देवघर प्रकल्प विभाग, यांचे कार्यालय,**

**पत्ता: – निरा देवघर प्रकल्प विभाग, सांगवी (भाटघर), ता. भोर, जि. पुणे, महाराष्ट्र–४१२२०६ पुणे ४११००१**

**ई– मेल पत्ता: –** niradeoghar@gmail.com, **दुरध्वनी क्र. (०२११३) २०२०२०**

**निविदा सूचना क्र– ०२ सन २०२५–२६ प्रसिद्धी**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने, कार्यकारी अभियंता, निरा देवघर प्रकल्प विभाग, सांगवी (भाटघर), ता. भोर, जि. पुणे हे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडुन खालील कामाकरीता ई–निविदा प्रणालीद्वारे (Online) **निविदा** मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई–निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, निरा देवघर प्रकल्प विभाग, सांगवी (भाटघर), ता. भोर, जि. पुणे यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत

| अ.क्र. | कामाचे नांव | जिल्हा | निविदेची अंदाजित किंमत रुपये लक्ष |
|---|---|---|---|
| १. | निरा देवघर प्रकल्पांतर्गत, माळशिरस तालुक्यातील सहकारी ऐवजी शासकीय उपसा सिंचन योजनेचे सर्वेक्षण, संकल्पन व अंदाजपत्रक तयार करणेचे काम करणे. | सोलापुर | रु. ७५.७४ लक्ष |

**ई–निविदा उपलब्ध कालावधी :–** दि. ०१/१२/२०२५ ते ०८/१२/२०२५, सायं. ६.०० पर्यंत.

**निविदा उघडण्याचा दिनांक :–** दि. १०/१२/२०२५, दु. १२.०० वा.

**जा. क्र. निदेप्रवि/लेशा/निविदा/ ३३७१/सन २०२५ दि. २०/११/२०२५**

**कार्यकारी अभियंता, निरा देवघर प्रकल्प विभाग, सांगवी(भाटघर), ता. भोर, जि. पुणे यांचे कार्यालय.**

सही/–
(स्वप्निल वि. कोडुलकर)
**कार्यकारी अभियंता**
**निरा देवघर प्रकल्प विभाग**
**सांगवी (भाटघर), ता. भोर, जि. पुणे**

विमाका/पुणे/जाहि./२३५/२०२५–२६



निर्भिड व सडेतोड बातम्या नियमित वाचा...

साप्ताहिक माणदेश वार्ता



माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com

संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष–४३ वे अंक–५ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# सांगोला नगरपरिषद निवडणूक नगराध्यक्ष पदासाठी ११ उमेदवार तर नगरसेवक पदासाठी १०३ उमेदवार मैदानात

## नगराध्यक्ष पदाचे उमेदवार

राहुल श्रीमंत इंगोले, मोहसीन ईलाही खतीब, चंद्रकांत हणमंत चव्हाण,
विश्वेश प्रबुध्दचंद्र झपके, स्वप्निल विश्वंभर नागणे, मारुती तुळशीराम बनकर,
बापुसाहेब भगवान भाकरे, उमेश ज्ञानू मंडले, आनंदा गोरख माने, शौकत अब्दुल मुलाणी, मोहन विष्णू राऊत.

**प्रभाग क्रमांक १ अ**
ऐश्वर्या मधुकर कुंभार, मिरा धनंजय मस्के, राणी आनंदा माने, कोमल नवनाथ शिंगाडे

**प्रभाग क्रमांक १ ब**
राहुल श्रीमंत इंगोले, भारत दिगंबर गडहिरे, मोहन गणपत बाबर, रामचंद्र बापू मदने, नवनाथ मोहन शिंगाडे

**प्रभाग क्रमांक २ अ**
प्रशांत बबन धनवजीर, चंचल सर्जेराव बनसोडे, महादेव वसंत बनसोडे, विनोद पोपट रणदिवे

**प्रभाग क्रमांक २ ब**
दिपाली प्रविण इंगोले, प्रियांका पांडूरंग देशमुख, संगिता दत्तात्रय देशमुख, पाकीजा रुस्तुम नदाफ, वैशाली सतिश सावंत

**प्रभाग क्रमांक ३ अ**
समृध्दी जयसिंग खडतर, शितल विकास ठोकळे, कविता तुकाराम बनसोडे, गोदाबाई भारत बनसोडे

**प्रभाग क्रमांक ३ ब**
सचिन शंकर पवार, अरूण विलास पाटील, अरुण सदाशिव पाटील, कुंदन फुलचंद बनसोडे, विजय तानाजी बनसोडे

**प्रभाग क्रमांक ४ अ**
स्वाती मकरंद अंकलगी, बिस्मिल्लाह शब्बीर बागवान, आशादेवी सोमेश्वर यावलकर

**प्रभाग क्रमांक ४ ब**
संतोष उद्धव इंगोले, ज्ञानेश्वर बाळकृष्ण तेली, दिलावर हुसेन तांबोळी, विनोद बाबुराव बाबर, किरण नारायण माळवे, महेश सुभाष राऊत, सुहास सुधाकर होनराव.

**प्रभाग क्रमांक ५ अ**
काशिलिंग दगडू गावडे, यश सिद्धेश्वर जाधव, स्वप्निल विश्वंभर नागणे ,सुरज बबन शिंदे

**प्रभाग क्रमांक ५ ब**
नंदा भारत गडहिरे, पूजा दादासाहेब माने, छाया सूर्यकांत मेटकरी

**प्रभाग क्रमांक ६ अ**
तनुजा बाळासाहेब एरंडे, महेजबीन शकील मुजावर, सीमा समाधान सरगर

**प्रभाग क्रमांक ६ ब**
सिद्धनाथ जगन्नाथ भोसले,गोविंद अंबादास कोरे, पोपट मधुकर मेटकरी, चैतन्य ज्ञानू राऊत, विश्वनाथ सावता राऊत

**प्रभाग क्रमांक ७ अ**
गणेश शिवाजी बनकर, किरण नारायण माळवे, किशोर कृष्णा म्हमाणे, मोहन विष्णू राऊत, सुनील चंद्रकांत सुळे

**प्रभाग क्रमांक ७ ब**
शारदा हेमंत आदलिंगे, सुचिता अमोल पवार, शोभा निवृत्ती फुले, भाग्यवती शहाजी सावंत

**प्रभाग क्रमांक ८ अ**
नंदा भारत गडहिरे,शीतल विकास ठोकळे, शितल विलास लादे ,श्रद्धा रवीप्रकाश साबळे

**प्रभाग क्रमांक ८ ब**
दिलीप बाबू जाधव, रमेश पांडुरंग जाधव, शोभा संजय देशमुख, किरण मोहन बनसोडे

**प्रभाग क्रमांक ९ अ**
मोहसीन इलाई खतीब, उत्तम सोमनाथ ढोले, आनंद दत्तात्रय दौंडे, विनोद बाबुराव बाबर, जुबेर इकबाल मुजावर

**प्रभाग क्रमांक ९ ब**
रेशमा निसार खतीब, राजनंदिनी राकेश ढाणके,दिव्यांनी सौरभ दौंडे ,शमशाद असगर पठाण, सना तोहीद शेख

**प्रभाग क्रमांक १० अ**
प्रिया मानस कमलापूरकर, वैशाली सिद्धार्थ झपके, स्वाती काशिनाथ ढोले, मलिका नौशाद मणेरी, हिना फिरोज मणेरी

**प्रभाग क्रमांक १० ब**
अनिकेत बाबुराव काळे, चंद्रकांत हणमंत चव्हाण, महालिंग महादेव पाटणे, विवेक दिलीप पाटील, समीर साहेबराव पाटील, संतोष मधुकर महिमकर, अमोल मोहन लऊळकर, देवराज सुभाष लोखंडे

**प्रभाग क्रमांक ११ अ**
सुजाता चेतनसिंह केदार सावंत, जाकेरा रियाज तांबोळी, श्रद्धा किरण बुर्ले, मेहजबीन शकील मुजावर, अजमुनिस्सा इब्राहिम मुल्ला

**प्रभाग क्रमांक ११ ब**
अनिता निलेश केदार, इंदुमती अशोक चव्हाण

**प्रभाग क्रमांक ११ क**
नितीन विठ्ठल इंगोले, उन्मेष लक्ष्मणराव खंडागळे, शकील महमूद मुजावर.गुलामे मुस्तफा शौकत मुलाणी

## शहीद अशोक कामटे संघटनेच्यावतीने ७६ वा संविधान दिन, शहिदांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिर व विविध कार्यक्रमांचे आयोजन



सांगोला : सांगोल्यातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय (रजी .)सामाजिक संघटनेच्यावतीने बुधवार दि २६ नोव्हेंबर २०२५ रोजी शहीद दिन, संघटनेचा १६ वा वर्धापन दिन तसेच ७६ व्या संविधान दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर मुंबईतील झालेल्या दहशतवादी हल्ल्याला १६ वर्षे पूर्ण होत आहे . शहिदांच्या स्मरणार्थ सांगोल्यात विविध कार्यक्रमांचे आयोजित करण्यात आल्याची माहिती संस्थापक निलकंठ शिंदे सर यांनी संघटनेच्यावतीने दिली.

स्टेशन रोड येथे विटा बँकेसमोर बुधवारी सकाळी या शिबिराचे उद्घाटन प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे , सकाळी ९ ते ६ या वेळेत रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. स्वातंत्र्य सैनिकांचा सन्मान, वीर माता ,पिता व माजी सैनिक यांचा व सांगोल्यातील भूमिपुत्र व प्रशासकीय सेवा बजावणारे अधिकारी व कर्मचारी यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर दुपारी ४ वाजता भव्य किल्ले स्पर्धा २०२५ बक्षीस वितरण, २६/११ तील शहिदांना आदरांजली वाहने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

भारतीय ७६ वा संविधान दिन ,संघटनेचा १६ वा वर्धापन दिन व मुंबई येथील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सदर शिबिराचे आयोजन गेल्या १६ वर्षापासून करण्यात येत आहे. सध्या रक्ताची तीव्र टंचाई असल्याने रक्तदान शिबिराचे आयोजनाचा हेतू असल्याचे सांगितले .

प्रत्येक रक्तदात्यांना संघटनेच्या कार्यालयात रक्तदात्यांनी एकाच वेळी गर्दी न करता आपली आगाऊ रक्तदान नोंदणी संघटनेच्या स्टेशन रोड येथील शिंदे मशिनरी स्टोअर्स स्टेशन रोड ,सांगोला कार्यालयात दिनांक २० नोव्हेंबर २०२५ पासून सुरु केलेली आहे.कार्यक्रमाच्या व शिबिराच्या नोंदणी माहिती करिता कार्याध्यक्ष मकरंद पाटील भ्रमणध्वनी क्रमांक ९८५००४८५१४ यांच्याशी संपर्क साधावा.

यापूर्वीसुद्धा आपण अशोक कामटे संघटनेच्या विनंतीस मान देऊन याच सामाजिक उपक्रमात अनेकवेळा सहभागी झाले असून भविष्यात गरजू रुग्णांना रक्ताची गरज भागवण्यासाठी आपल्या रक्तदान करण्यामुळे एखाद्या व्यक्तीचा जीव वाचू शकतो त्याचबरोबर वीर पत्नी विनिताताई कामटे यांनीही रक्तदानाने शहिदांना श्रद्धांजली अर्पण करावी असा संदेश दिलेला आहे, म्हणून अशा सामाजिक कार्यास आपण शहिदांना श्रद्धांजली रक्तदानाने अर्पण करावी असे आव्हान शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेने केले आहे.

## पंढरपूर अर्बन बँकेचा स्थापना दिवस उत्साहात संपन्न



सांगोला : सोलापूर जिल्ह्याची अर्थवाहिनी म्हणून ओळख असणाऱ्या १९ नोव्हेंबर १९१२ रोजी स्थापित झालेल्या पंढरपूर अर्बन बँकेचा ११४ वा स्थापना दिवस मोठ्या उत्साहात व आनंदात पार पडला. मार्गदर्शक प्रशांत परिचारक यांनी बँकेच्या इतिहासाची गौरव गाथा त्यांच्या शब्दात वर्णन केली व व्यवसाय विस्तार कसा केला याची माहिती सांगितली.

यावेळी बँकेचे विद्यमान चेअरमन यांनी बँकेला लाभलेले बँकेचे सर्व सभासद व त्यांचा असणारा विश्वास हेच आपल्या बँकेच्या यशस्वी वाटचालीचे गमक आहे हा ग्राहकांचा विश्वास आपले बँकेवरती सदैव वाढत राहो व उत्तरोत्तर अशीच बँकेची प्रगती होत राहो अशी रुक्मिणी पांडुरंग चरणी प्रार्थना केली. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विरधे यांनी सर्व उपस्थित मान्यवर ग्राहकांचे व पाहुण्यांचे आभार व्यक्त केले.

यावेळी विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय संघटन मंत्री मा.श्री.दादा वेदक यांनी भेट देऊन बँकेचे कामकाज बाबत समाधान व्यक्त करीत बँकेने पुढील असाच शाखा विस्तार करीत २०० वर्ष पूर्ण करावीत. याप्रसंगी बँकेचे व्हाईस चेअरमन माधुरीताई जोशी, संचालक रजनीश कवठेकर, हरिष ताठे, पांडुरंग घंटी, शांताराम कुलकर्णी, विनायक हरिदास, राजाराम परिचारक, अमित मांगले, अनंत कटप, गणेश शिंगण, ऋषिकेश उत्पात, व्यंकटेश कौलवार, मनोज सुरवसे, अनिल अभंगराव, गजेंद्र माने, तज्ञ संचालक अतुल कौलवार, प्रभुलिंग भिंगे, उदय उत्पात, सोमनाथ होरणे, शुभम लाड, संचालिका संगिता पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# आमची लढाई ही कुणाला एकटे पाडण्यासाठी नाही, आमची लढाई कुणाचे दुकान बंद करण्यासाठी नाही तर आमची आघाडी सांगोला शहराच्या विकासाची :- ना.जयकुमार गोरे

## सांगोला शहर विकास आघाडीच्या प्रचाराचा शुभारंभ व पदयात्रा उत्साहात संपन्न



सांगोला : भाजप, शेकाप व दिपकआबा गटाचे आमचे पॅनेल आले तर सांगोल्याला काहीही कमी पडू देणार नाही . सांगोला शहराचा विकास करायचा असेल तर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेसोबत रहावे लागेल. सांगोला शहराच्या विकासासाठी लागेल तो पैसा, लागेल ती व्यवस्थी देण्याची क्षमता फक्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये आहे.त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच सांगोला शहराचा विकास करु शकतील. त्यामुळे ही निवडणुक व्यक्तीवर टिका करण्यापेक्षा सांगोला शहराच्या विकासाच्या मुद्दयावर लढूया, असे आवाहन ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांनी केले.

आगामी नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सांगोला शहर विकास आघाडीच्या प्रचाराचा शुभारंभ आणि भव्य पदयात्रा शनिवारी उत्साहात पार पडली. ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांच्या शुभहस्ते प्रचाराचा विधिवत शुभारंभ करण्यात आला. शुभारंभानंतर आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत शहरातील प्रमुख मार्गावरून पदयात्रा काढण्यात आली.पदयात्रेचे रुपांतर अंबिकादेवी मंदिराच्या प्रांगणांत सभेत झाले. यावेळी ना.जयकुमार गोरे बोलत होते. याप्रसंगी आ.डॉ.बाबासाहेब देशमुख, माजी आमदार दिपकआबा साळुंखे–पाटील, चेतनसिंह केदारसावंत, बाळासाहेब एरंडे, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार मारुतीआबा बनकर व सर्व उमेदवार यांच्यासह शेकाप, भाजप व दिपकआबा गटांतील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना पालकमंत्री नाम. जयकुमार गोरे म्हणाले की, सर्वांना सोबत घेऊन आघाडी करण्याचा निर्णय घेतला आहे. आमची लढाई ही कुणाला एकटे पाडण्यासाठी नाही, आमची लढाई कुणाचे दुकान बंद करण्यासाठी नाही तर आमची आघाडी सांगोला शहराच्या विकासाची आहे, शहरवासियांना जे आवश्यक आहे ते देण्यासाठी आमची आघाडी आहे. इथे विचाराचा विषय नाही इथे विकासांचा विषय आहे. आमच्या सर्वांचे वेगवेगळे विचार जरी असले तरी सांगोला नगरपालिकेची आघाडी करताना सर्वांना विश्वासात घेऊन निर्णय घेतला असून कोणालाही नाराज करुन, प्रेशर टाकून आघाडी केली नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आम्ही भाजपा सांगोला शहरासोबत आहोत त्यामुळे आता शहराच्या विकास कामांची चिता करायचे काही काम नाही, सांगोला शहराचा विकास करायचा असेल तर देवाभाऊ शिवाय पर्याय नाही. शेवटी विकासाला निधी लागतो. त्यामुळे निधी देण्याची क्षमता फक्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे आहे त्यामुळे आपले मारुती आबा कुठल्याही व कसल्याही परिस्थितीत नगराध्यक्ष झाले पाहिजेत.नगरपालिकेला आमचे पॅनेल आले तर कुणालाही कसलीही अडचण येणार नाही आणि काहीही कमी पडू देणार नसल्याची ग्वाही पालकमंत्री ना.गोरे यांनी दिली. स्व.आबासाहेबांनी राजकारण करत असताना या महाराष्ट्राला अनेक आदर्श घालून दिले आहेत. शेकापचा विचार वाढवत असताना जेव्हा जेव्हा तालुक्याच्या विकासासाठी कुणाची मदत घ्यायची असेल तर आबासाहेबांनी कधीही मागे पुढे बघितले नाही, माझा तालुका, माझी माणसे, माझ्या लोकाचे काम प्रथम ही भूमिका आबासाहेबांनी पहिल्यांदा घेतली आहे. आबासाहेबांनी जे नात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेसोबत जोडले ते नाते आजही आदराने सांगत असून आबासाहेबांच्या नातवांना जपा अशी आजही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका असल्याचे आवर्जुन त्यांनी सांगितले.

आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख म्हणाले, सांगोल्यात नगरपालिका निवडणुकीच्या आपल्या आघाडीच्या निर्णयानंतर शांतता बिघडवण्याचे काम काही लोकांनी केले. शहराच्या विकासासाठी शेकाप अणि भाजप आणि दिपक आबा एकत्रीत आल्यानंतर काही स्वच्छ आणि जनतेच्या मनातील चेहरा म्हणून मारुतीआबांना उमेदवारी– ना.जयकुमार गोरे मारुतीआबांनी स्व.आबासाहेबांसोबत काम केले आहे. सोबत राहून नुसते कामच केले नाही तर व्यक्तीगत स्वत:चेही वेगळे व्यक्तीमत्व तयार केले आहे. सर्वांना विश्वासात घेऊन उमेदवार निवडला आहे. मारुती आबांनी कुणाला लुटले नाही, त्यांच्यावर टक्केवारी, भ्रष्टाचाराचा एकही आरोप नाही, अशा सज्जन माणसाला शहराच्या विकासाच्या दृष्टीने नेतृत्व दिले आहे. जणांना वाईट वाटत असेल तर खुशाल वाईट वाटुद्या. आम्हाला फक्त विकासाचे काम करायचे आहे, मला कुणावर टीका करायची नाही आणि चिमटेही काढायचे नाहीत.

शहराच्या समस्या सोडविण्यासाठी विकास आघाडी केली आहे. विरोधकांकडून मागच्या २ वर्षात जे शब्द दिले ते कागदावरच राहिले आहेत. यापुढील काळात सर्वसामान्य जनतेचे कोणाचेही काम मागे राहणार नाही अशी ग्वाही देत सर्वांनी पॅनेल टू पॅनेल काम करावे, असे आवाहन करुन रात्रीचा दिवस करत डोळ्यात तेल घालून आपल्या उमेदवारांना निवडून आणावे, असे सांगितले.

यावेळी यावेळी मा.आम. दिपकआबा साळुंखे–पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष श्री.चेतनसिंह केदार–सावंत यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# युवा नेतृत्व व तळागाळातील संपर्क या समीकरणामुळे यश नाथा जाधव प्रभाग क्रमांक ५ अ मध्ये एक मजबूत उमेदवार

सांगोला : आगामी सांगोला नगरपालिका निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर प्रभागांत तसेच शहरात राजकीय हालचाली वेगाने सुरू झाल्या असून यामध्ये यश नाथा जाधव यांची उमेदवारी सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे.



स्थानिक पातळीवर युवा नेतृत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली असून अनेक सामाजिक उपक्रमांमुळे त्यांचा शहरातील तरुणांमध्ये प्रभाव वाढत आहे. यश जाधव हे तरुण, उत्साही आणि लोकाभिमुख नेतृत्व म्हणून ओळखले जात असून, वडिलांच्या कार्यकाळात निर्माण झालेला नागरिकांशी जवळचा संपर्क त्यांना थेट लाभतो आहे. शहरातील अनेक वाड्या, प्रभागांमध्ये त्यांच्या कुटुंबाचा प्रभाव आजही कायम आहे. त्यांच्या वडिलांचे–नाथा जाधव, माजी नगरसेवक–यांचे प्रभागात अजूनही मोठे वजन आणि प्रभाव असल्याने यश जाधव यांना या निवडणुकीत नैसर्गिकच मोठा फायदा मिळत आहे.

प्रभाग क्रमांकात जाधव कुटुंबाचा अनेक वर्षांचा जनसंपर्क, लोकांशी जवळीक, सामाजिक कामांतील सक्रियता आणि विश्वासार्हता आजही टिकून आहे. त्याचा परिणाम म्हणून यश जाधव यांची प्रचार मोहीम सुरुवातीपासूनच जोमात सुरू झाली आहे.

गेल्या काही दिवसांत त्यांनी केलेल्या भेटीगाठी आणि संवाद मोहिमेला नागरिकांचा अपेक्षितपेक्षा जास्त प्रतिसाद मिळत आहे. शांत, अभ्यासू आणि लोकाभिमुख शैलीत काम करणारे यश जाधव हे नव्या पिढीचे सक्षम नेतृत्व म्हणून पाहिले जात आहे. शहरातील विविध वाड्या–प्रभागांमध्ये वाढत्या पाठिंब्यामुळे त्यांच्या नावाला उमेदवारांच्या यादीत विशेष स्थान मिळाले आहे. स्थानिक ज्येष्ठ नागरिक, व्यावसायिक, महिला गट तसेच युवक संघटनांचा कडूनही यश जाधव यांच्या बाजूने सकारात्मक कल दिसत आहे.

राजकीय समीक्षकांचे म्हणणे आहे की, युवा नेतृत्व + तळागाळातील संपर्क या समीकरणामुळे यश नाथा जाधव हे सांगोला निवडणुकीत एक मजबूत उमेदवार म्हणून पुढे येत आहेत.


